ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २० | पुणें, बुधवार तारीख २९ डिसेंबर, १९५४ | अंक ४७

## विविध माहिती

**मद्रास राज्यांतील विजेचें उत्पादन**—विजेच्या उत्पादनाचें जें उद्दिष्ट मद्रास राज्यानें ठरविलें आहे, तें चालू वर्षअखेर गांठण्यांत यश येईल, असें समजतें. पहिल्या पंचवार्षिक योजनेप्रमाणें पूर्वीपेक्षा १,११,००० किलोवॅट अधिक वीज निर्माण करण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें होतें. मद्रास शहरांत १५,००० किलोवॅट विजेचें नवें केंद्र उघडण्यांत आल्यामुळें उत्पादनाचें उद्दिष्ट गांठल्यासारखेंच झालें आहे.

**विमान-मार्ग पुन्हा चालू होणार**—मुंबई-मद्रास-तिरुचिरापल्ली-मदुरा हा बंद करण्यांत आलेला विमानमार्ग पुन्हा चालू करण्याचा विचार इंडिअन एअरलाइन्स कॉर्पोरेशन करीत आहे, असें समजतें. एअर सीलोनचीं विमानें सध्यां जाफना-तिरुचिरापल्ली ह्या मार्गावर वहातूक करतात. हाच मार्ग पुढें वाढवून कोचीनपर्यंत नेण्यासंबंधीं कॉर्पोरेशन एअर-सिलोनशीं बोलणीं करणार आहे.

**रेल्वेवरील पहिला वर्ग जाणार**—हल्लीं भारतीय रेल्वे मार्गांवर ज्या ठिकाणीं पहिल्या वर्गाचे डबे आहेत, त्यांपैकीं कांहीं डबे जानेवारी १९५५ पासून आणि उरलेले व एप्रिल १९५५ पासून रद्द करण्यांत येणार आहेत, अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. रेल्वेवरील इंटरचा वर्गहि रद्द करण्याचा विचार चालू आहे, असें समजतें.

**खुर्चीसारखी फिरणारी इमारत**—अमेरिकेंत ग्रँड जंक्शन ह्या ठिकाणीं कचेऱ्यांना उपयोगी पडण्यासारखी एक सहा मजली इमारत लवकरच बांधण्यांत येणार आहे. ह्या इमारतीचा विशेष असा कीं, तिचा पाया खुर्चीसारखा फिरणारा असा बांधण्यांत येणार आहे. तिच्या दोन बाजू कांचेच्या विटांच्या व दोन अल्युमिनमच्या असतील. हिंवाळा व उन्हाळा ह्यांच्यापासून होणारा त्रास इमारत फिरविल्यानें वांचेल, असें म्हणतात.

दक्षिण विभागांतील अग्रेसर बँक

## दि बेळगांव बँक लिमिटेड, बेळगांव.

शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३०.

**अखंड प्रगतीचीं २५ वर्षें पुरीं होत आहेत.**

| | | | |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ... | रु. | ६,००,००० |
| रिझर्व्ह | ... | रु. | २,१८,००० |
| खेळतें भांडवल | ... | रु. | १,२०,००,००० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

१. श्री. जी. एल्. गजेंद्रगडकर, बी. ए., रिटायर्ड डे. कलेक्टर, चेअरमन, २. श्री. एल. व्ही. देशपांडे, व्यापारी व्हाइस चेअरमन, ३. श्री. जी. व्ही. सराफ. बी. ए., एल्एल्. बी. ४. श्री. एम्. जी. ह्लेकर, बँकर ५. श्री. जे. डब्ल्यू. कलघटगी, व्यापारी, ६. श्री. एस. एम्. मुतूर, व्यापारी, ७. श्री. एन्. एस. शिराळी, रिटायर्ड टेलियाफ सुपरिंटेंडेंट, ८. श्री. बी. बी. पोतदार, बी ए., एल्एल्. बी. ९. श्री. ए. आर. नाईक, बी. ए., बी. एस्. सी., एल्एल्. बी. मॅनेजिंग डायरेक्टर.

**शाखाविस्तार :**

संकेश्वर, होसूर, ( बेळगांव ), गोकाक, वेंगुर्ला, मालवण, नंदगड, गडहिंग्लज, रामदुर्ग, चिकोडी, नरगुंद, शिरोडा, चिपळूण, कणकवली, निपाणी, बैलहोंगल, मिरज, अथणी, देवगड, ठळकवाडी, सावंतवाडी, सौंदत्ती, जयसिंगपूर.

सचोटीनें लोकसेवा करून वाढत्या विश्वासास पात्र होणें हेंच आमचें व्रत आहे.

रौप्यमहोत्सव समारंभ शुक्रवार ता. ३१ डिसेंबर १९५४ रोजीं सायंकाळीं ४-३० वाजल्यापासून साजरा होणार आहे.

केंद्रसरकारचे गृहमंत्री डॉ. कैलासनाथ काटजू यांनीं समारंभाचें उद्घाटन करण्याचें मान्य केलें आहे. सर्व भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांनीं अगत्यपूर्वक समारंभास येऊन उपकृत करावें.

बेळगांव
ता. २५।१२।५४

**एच्. एस्. कुलकर्णी**, बी. ए.
मॅनेजर,
दि बेळगांव बँक लि. बेळगांव

## कापडाच्या धंद्यांतील स्त्री-कामगार

१९५१ सालीं भारताच्या कापडाच्या धंद्यांत पूर्ण वर्षांत आलेले १०,३६,२४९ कामगार काम करीत होते; व त्यांपैकीं १,००,०९७ इतके स्त्री-कामगार होते. टक्केवारीच्या दृष्टीनें हें प्रमाण ९.७ टक्के असें पडतें. अहमदाबादच्या कापड गिरण्यांतील मजुरांपैकीं 'वाइंडिंग' खात्यांत जितके लोक काम करतात त्यांतील ५४% मजूर स्त्रिया आहेत, आणि 'रीलिंग' खात्यांतील ७७ टक्के मजूर स्त्रिया आहेत. इंदूरमधील गिरण्यांत ह्याच खात्यांतील स्त्री-मजुरांचें प्रमाण अनुक्रमें ९३ टक्के आणि ८० टक्के असें आहे. त्रिचूर येथील गिरण्यांतून ह्या दोन्ही खात्यांत सर्वस्वी स्त्री-कामगारच काम करितात. मुंबईच्या गिरण्यांतील 'वाइंडिंग' खात्यांत ६१ टक्के मजूर स्त्रिया आहेत. रीलिंग खात्यांत मात्र त्यांचें प्रमाण २५ टक्के इतकेंच आहे. ज्यूटच्या गिरण्यांतून 'बॅचिंग' प्रिपेअरिंग व 'फिनिशिंग' खात्यांत स्त्रिया काम करतात. प. बंगालमध्यें भारताचा ज्यूट-गिरण्यांचा धंदा एकवटलेला आहे. ह्या गिरण्यांतील कामगारवर्गांत वरील खात्यांत काम करणाऱ्या स्त्री-कामगारांचा भरणा जवळ जवळ ८० ते १०० टक्के इतका आहे. रेशमाच्या गिरण्यांतून 'वाइंडिंग' खात्यांत बहुतकरून सर्व स्त्रियांचाच भरणा असतो. स्त्री आणि पुरुष कामगारांना सारख्याच कामाकरतां सारखाच पगार द्यावा, हें तत्त्व भारतांत परवा परवापर्यंत मान्य झालेलें नव्हतें. बॉंबे टेक्स्टाईल लेबर इन्क्वायरी कमिटीनें स्त्री-कामगारांना कमी श्रेणीचें वेतन मिळावें अशी शिफारस १९४० सालीं केली होती. अलीकडे मात्र सारख्याच कामासाठीं स्त्री-पुरुष कामगारांना मिळणाऱ्या वेतनांत तफावत असूं नये, ह्या तत्त्वाचा सामान्यतः अंगीकार करण्यांत आला आहे.

ह्या तत्त्वाचा अंगीकार केल्यानंतरसुद्धां स्त्री आणि पुरुष कामगारांच्या सरासरी वेतनांत बराच फरक राहिलेला आढळून येतो; पण ह्याचा अर्थ वेतनाच्या श्रेणींत फरक असतोच असा मात्र नाहीं. कारण, सरासरी वेतन हें जसें वेतनाच्या श्रेणीवर अवलंबून असतें तसेंच स्त्री-पुरुष कामगारांची वांटणी ज्या प्रकारच्या कामांत झालेली असते त्यावरही अवलंबून असतें. सामान्यतः स्त्री-कामगार हे बिन-कुशल काम करीत असतात. त्यामुळें त्यांचें सरासरी वेतन पुरुष-कामगारांच्या सरासरी वेतनापेक्षा बहुधा कमी असण्याचा संभव असतो. इंडस्ट्रिअल कोर्टाचे निवाडे, ट्रायब्यूनल्सचे निर्णय, इत्यादींमुळें भारतांतील कापडाच्या केंद्रांतील वेतनांच्या श्रेणी कांहीं ठराविक पातळीवर आलेल्या आहेत. कांहीं कापडाच्या केंद्रांतील मासिक किमान वेतनें पुढीलप्रमाणें ठरविण्यांत आलीं आहेत. मुंबई ३० रुपये; कानपूर ३० रुपये; अहमदाबाद २८ रुपये; सोलापूर, इंदूर, नागपूर व मद्रास २६ रुपये; प. बंगाल २० रुपये. महागाई भत्ता हा रहाणीच्या खर्चाच्या निर्देशांकाशीं जोडलेला असतो. हा भत्ता १९५२ मध्यें नागपूरसारख्या ठिकाणीं ४२ रु. होता व अहमदाबाद सारख्या ठिकाणीं ७५ रु. होता. प. बंगालमध्यें महागाई भत्ता सरसकट मासिक २० रुपये ह्या दरानें देण्यांत येतो. वेतन आणि महागाई-भत्ता ह्यांच्या बाबतींत प. बंगालखेरीज इतरत्र स्त्री आणि पुरुष कामगारांत भेद केला जात नाहीं. प. बंगाल्यांत मात्र पुरुष कामगारांना जें वेतन व जे भत्ते मिळतात त्यांच्या तीन-चतुर्थांश दरानें स्त्री-कामगारांना वेतन व भत्ते देण्यांत येतात.

## मशीन टूलसचा धंदा

इंडिअन मशीन टूल्स मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ह्या संस्थेची आठवी सर्वसाधारण सभा हैदराबाद येथें भरली होती. सभेचे अध्यक्ष श्री. एस्. बी. जांभेकर ह्यांनीं मशीन टूल्स तयार करणाऱ्या कारखानदारांची बाजू आपल्या भाषणांत विशद करून सांगितली. ते म्हणाले कीं, ह्या धंद्याची वाढ होण्यासाठीं सरकारला पुष्कळ गोष्टी करतां येण्यासारख्या आहेत. अशा प्रकारच्या परदेशीय यंत्रांच्या आयातीवर निर्बंध घालण्यांत आले पाहिजेत. गुंतागुंतीचीं यांत्रिक हत्यारें भारतांत तयार होण्यासाठीं देशी कारखान्यांना द्रव्यसाहाय्य देण्यांत आलें पाहिजे. मध्यपूर्व-कडील देश आणि आग्नेय आशिया ह्या भागांत अधिक निर्यात करण्यास वाव दिला पाहिजे. त्याचबरोबर देशांतील कच्च्या मालाची परदेशीं होणारी निर्यात थांबविण्यांत आली पाहिजे; आणि बिडाचें लोखंड, कोळसा, कोक आणि पोलाद ह्यांचें उत्पादन वाढविण्यांत आलें पाहिजे. देशांत यांत्रिक हत्यारांची सध्यां जितकी गरज आहे त्यांपैकीं अवघी १५ टक्के गरज देशी कारखान्यांकडून भागविली जाते. अर्थात् बाकीची गरज आयात करूनच भागवावी लागते. अशा आयातीमुळें देशाला ३ कोटी रुपये किंमतीच्या परकीय हुंडणावळीला मुकावें लागतें. देशाच्या संपत्तीचा परदेशीं जाणारा हा ओघ थांबविण्यासाठीं जोराचे प्रयत्न करण्यांत आले पाहिजेत. अधिक गुंतागुंतीचीं अशीं यांत्रिक हत्यारें पुरविण्याच्या कामीं भारतीय कारखाने पुरे पडत नाहींत, ही गोष्ट आज खरी आहे. पण त्याचें कारण धंद्याचा विकास करण्यासाठीं जो पैसा लागतो त्याचा अपुरा पुरवठा हें आहे.


दि
बँक ऑफ महाराष्ट्र लि.

स्थापना : १९३५

बँकेच्या शाखा

अहमदनगर, अमरावती, मुंबई (फोर्ट, गिरगांव, दादर व जव्हेरी बाजार) भिवंडी, चाळीसगांव, धुळें, हरिहर, हुबळी, द. हैद्राबाद, जळगांव, कल्याण, कोल्हापूर, कोपरगांव, नागपूर, नाशिक, पनवेल, रत्नागिरी, सांगली, सोलापूर (फलटण गल्ली व मुरारजी पेठ), श्रीरामपूर, ठाणें, पुणें (भवानी पेठ, डेक्कन जिमखाना व खडकी).

सेफ डिपॉझिट व्हॉल्टस्

पुढील ठिकाणीं सेफ डिपॉझिट व्हॉल्टस्‌ची व्यवस्था केली आहे.

मुख्य कचेरी व डेक्कन जिमखाना पुणें, सोलापूर (फलटण गल्ली शाखा) नाशिक, अहमदनगर व श्रीरामपूर.

मुख्य कचेरी : थोरले बाजीराव रस्ता, पुणें २.

चिं. वि. जोग
मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. २९ डिसेंबर, १९५४





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद् वामन काळे


## उद्योगधंद्यांच्या बाबतींत सरकारचें धोरण

कलकत्ता येथें असोसिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्स या बड्या व्यापारी संस्थेपुढें ता. १३ डिसेंबर रोजीं अर्थमंत्री श्री. देशमुख यांनीं सरकारी धोरणाचें उद्योगधंद्यांच्या बाबतींत खुलासा करणारें अर्थपूर्ण भाषण केलें. गेले कांहीं महिने मोठाल्या उद्योगधंद्यांचें स्थान संकुचित होईल अशी भीति वाटत होती. ही भीति निष्कारण आहे अशा अर्थाचा खुलासा सदरहू भाषणांत आढळतो. भारतांतील नियोजनाचें उद्दिष्ट सर्वांगीण विकास लोकशाहीच्या पद्धतीनें साधणें हा असून अशा प्रकारचें व्यापक उद्दिष्ट जगांतील इतर देशांत कोठेंहि आढळत नाहीं, असें श्री. देशमुख यांनीं सांगितलें. राहाणीचें मान दुप्पट करणें हें उद्दिष्ट १९७६ पर्यंत गांठावयाचें आहे व त्याचबरोबर देशांत दिसून येणारी बेकारी दहा वर्षांत पूर्णपणें दूर करावयाची आहे. देशाच्या वार्षिक उत्पादनापैकीं निदान १० ते १२ टक्के रक्कम भांडवलाच्या रूपानें पुन्हां गुंतविली गेली पाहिजे, तरच हें उद्दिष्ट साध्य होऊं शकेल. कर-पद्धतींत थोडी-फार सुधारणा करणें शक्य झालें तरीहि नियोजनाचें उद्दिष्ट साधण्यासाठीं वार्षिक उत्पन्नापैकीं १० ते १२ टक्के भाग नवीन उत्पादक भांडवलाच्या दृष्टीनें उद्योगधंद्यांत गुंतविला गेला पाहिजे. आज देशापुढें असलेल्या प्रश्नांची आंकड्यांच्या आधारें माहिती गोळा करण्याचें व त्यापासून अनुमानें काढण्याचें कार्य कलकत्ता येथील 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्टॅटिस्टिक्स' या संस्थेनें हातीं घेतलें असून या उपयुक्त माहितीचा जरूर तो उपयोग दुसरी पंचवार्षिक योजना निश्चित करतांना केला जाईल. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत सार्वजनिक स्वरूपाच्या व खाजगी स्वरूपाच्या अशा दोन्हीहि बाजूंवर भर द्यावा लागणार आहे, हें निश्चित. असें असल्यामुळें श्री. देशमुख यांनीं या दोनाहि विभागांत संपूर्ण सहकार्य दिसून येणें अगदीं आवश्यक असल्याचें सांगितलें. नियोजनाचें कार्य फार मोठें असल्यामुळें या बाबतींत जबाबदारी पत्करण्याची तयारी खासगी भांडवलदारांची होईपर्यंत सरकारला अर्थात् थांबतां येणार नाहीं. अशी जबाबदारी सरकारनें सर्वसामान्य हितासाठीं उचलल्यास त्याबद्दल खाजगी क्षेत्रांतील भांडवलदारांना शंका वाटण्याचें कांहींच प्रयोजन नाहीं. सरकारी क्षेत्राचा विस्तार हा खासगी क्षेत्राच्या आड येतो किंवा असा विस्तार खासगी क्षेत्र मर्यादित करतो, असें मानण्याचें मुळींच कारण नाहीं. विकासाचें सर्वांगीण कार्य चालू राहण्यासाठीं खासगी उद्योगधंद्यांना आपलें स्वतःचें क्षेत्र वाढवावेंच लागेल, अशी परिस्थिति आहे. सरकार खासगी उद्योगधंद्यांना इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन व इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन अशा संस्थांमार्फत आर्थिक मदत करील. आजच्या परिस्थितींत खासगी क्षेत्रांतील कारखानदारांना बदललेल्या परिस्थितीशीं मानसशास्त्राच्या दृष्टीनें थोडेसें मिळतें घ्यावें लागेल, एवढेंच.

कंपनी बिलाच्या दुरुस्तीबद्दल कारखानदारांना भीति वाटते. याहि बाबतींत दुरुस्तीबद्दलचा विचार अगदीं सावकाश विचारपूर्वक चालला आहे. १९५१ च्या कायद्यानें सरकारला मिळालेली सत्ता ही फार तर एक-दोन बाबतींतच वाढविली जाईल. कंपनी बिलांतील दुरुस्तीमुळें कोणतेहि फेरबद्दल झाले तरी त्यांत खासगी क्षेत्रांतील कारखानदारांना भिऊन जाण्यासारखें फारसें कांहीं नाहीं, असें मत श्री. देशमुख यांनीं वरील भाषणांत व्यक्त केलें. खासगी मालमत्ता सरकारला संपादन करितां यावी या उद्देशानें घटनेच्या ३१ व्या कलमाच्या दुरुस्तीबद्दल असें सांगण्यांत आलें कीं, ही दुरुस्ती जरी कदाचित् झाली तरी योग्य नुकसान-भरपाई मिळण्याच्या हक्काबद्दल कोणत्याहि रीतीनें संशय बाळगण्याचें कारण नाहीं. म्हणजे, या हक्काला कात्री लागणार नाहीं.

श्री. देशमुख यांचें भाषण सरकारी धोरणाचा खुलासा करणारें असून त्या भाषणांत खासगी क्षेत्रांतील भांडवलदारांनीं सरकारी धोरणाबद्दल साशंक राहाण्याचें मुळींच कारण नाहीं, अशा आशयाचा खुलासा स्पष्टपणें आढळतो. असोसिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष यांनीं आपल्या प्रारंभींच्या भाषणांत व्यापारी जगांत, सरकारच्या समाजवादाच्या दृष्टीनें जाणाऱ्या स्पष्ट धोरणाबद्दल काळजी निर्माण झाली आहे व त्यामुळें खासगी कारखानदारीचें क्षेत्र संकुचित बनत चाललें आहे व खासगी कारखानदारांच्या कार्याबद्दल अविश्वास निर्माण होत चालला आहे असें सांगितलें. देशाची अर्थव्यवस्था प्रगतीच्या मार्गावर आहे हें त्यांनाहि मान्य आहे. संमिश्र अर्थव्यवस्थेमध्येंहि खासगी क्षेत्राला भरपूर अवसर असला पाहिजे असें त्याचें म्हणणें. पंचवार्षिक योजनेची प्रगति अपेक्षेप्रमाणें झाली नाहीं याचें त्यांच्या मताप्रमाणें कारण म्हणजे, सरकारकडून समाजवादावर अतिशय जलद दिला जाणारा भर होय. असोसिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्सच्या कलकत्ता येथील वार्षिक अधिवेशनांत आठ ठराव पास करण्यांत आले. त्यांपैकीं एका ठरावानें खासगी क्षेत्रांतील व्यापार व उद्योगधंदे यांना पंचवार्षिक योजनेच्या कार्यक्रमांमध्यें विश्वासाचें व निश्चित स्थान प्राप्त व्हावें, अशी मागणी करण्यांत आली.

सरकारच्या औद्योगिक धोरणाचा खुलासा श्री. देशमुख यांनीं केलाच आहे. बदलणाऱ्या कालप्रवाहाशीं कारखानदारांनीं मानसशास्त्राच्या दृष्टीनें एकजीव झालें पाहिजे, ही त्यांची सूचना आजच्या परिस्थितींत विचार करण्यासारखी असून अगदीं अर्थपूर्ण आहे. खाजगी कारखानदारांचा कामगारवर्ग व बहुजनसमाजाचें कल्याण याद्दष्टीनें कांहीं बंधनें पाळावीं लागतात. परंतु अशी स्थिति इतर भांडवलशाही देशांतहि आहे. भारतांतील खासगी क्षेत्रांतील कारखानदारांना दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत निश्चित महत्त्वाचें स्थान आहे व तें त्यांनीं जबाबदारीपूर्वक अंगीकारण्यावरच देशाची सर्वांगीण प्रगति अवलंबून राहील असें दिसतें.

---

**बँक बंद होणार**—बँक ऑफ औरंगाबाद लि. ह्या बँकेच्या डायरेक्टरबोर्डाची खास सर्वसाधारण सभा भरून तींत बँकेचा कारभार गुंडाळण्याचा ठराव मंजूर करण्यांत आला असें समजतें. बँकेचें भांडवल १० लाख रुपयांचें असून ती गेलीं ११ वर्षें बँकिंगचे व्यवहार करीत असे.

## शेतीला कर्जपुरवठा

### गोरवाला कमिटीच्या शिफारसी

रिझर्व्ह बँकेच्या 'कमिटी ऑफ डायरेक्शन ऑन रूरल क्रेडिट'नें (गोरवाला कमिटीनें) शेतीच्या कर्जपुरवठ्यासंबंधीच्या अत्यंत धाडसाच्या व दूरगामी शिफारसी केल्या आहेत, त्यापैकीं एका शिफारसीची अमंलबजावणी करण्याचा सरकारचा निश्चय जाहीरहि झाला आहे. इंपीरिअल बँक व राज्य–सरकारांचा कमी-अधिक संबंध असलेल्या इतर १० बँका ह्यांचें राष्ट्रीयीकरण करण्याचें सरकारनें ठरविलें आहे. त्यांतून निर्माण होणारी स्टेट बँक ऑफ इंडिया सहकारी व इतर बँकांना असंख्य शाखांकरवीं आर्थिक मदत करील. आजच रिझर्व्ह बँकेचें व्यापारी बँकांवर बरेंच प्रभावी नियंत्रण आहे. हिंदी शेड्यूल्ड बँकांकडे जेवढ्या ठेवी आहेत, त्यांच्या ४०% ठेवी एकट्या इंपीरिअल बँकेकडे आहेत आणि तिचें राष्ट्रीयीकरण झालें म्हणजे सरकारचें बँकिंग क्षेत्रावरील आक्रमण कितीतरी पटीनें वाढणार आहे.

शेतकऱ्यांच्या कर्जविषयक गरजांचें चित्र गोरवाला कमिटीनें चांगल्या रीतीनें रेखाटलें आहे. आजच्या मागासलेल्या परिस्थितींतहि शेतकऱ्यांची वार्षिक कर्जउभारणी सुमारें ७५० कोटी रुपयांची असते. त्यापैकीं फक्त ३·३% रक्कम सरकार देतें व ३·१% रक्कम सहकारी संस्थांकडून मिळतें. ह्यापैकीं फार मोठा हिस्सा मोठ्या बागाइतदारांच्या वाट्यास जातो. लहान शेतकऱ्यांना फारच थोडीं कर्जे मिळूं शकतात. बहुतेक सोसायट्या जमिनींच्या तारणावर कर्जे देतात; ज्यांना असें तारण देतां येत नाहीं, त्यांना पतवान समजलें जात नाहीं. खासगी सावकाराचें शेतीच्या अर्थव्यवस्थेंत अद्याप केवढें मोठें स्थान आहे हें ह्यावरून लक्षांत येईल. सरकार जें करू शकत नाहीं, तें सावकार करीत आहे पण उत्पादनवाढीस किंवा संपत्तीच्या न्याय्य वाटणीस त्याचा सहाजीकच उपयोग होत नाहीं. सावकाराची पकड जबर असते व त्याला पाठिंबाहि मोठा असतो. अशा लोकांचा सहकारी चळवळीस विरोध आहे; पण त्यांतील कांहीं लोकांनीं सहकारी संस्थांत शिरून व त्या काबीज करून आपलें हित साधलें आहे. त्यामुळें सहकारी कर्जपुरवठ्याची प्रगति फारशी होऊं शकली नाहीं. अशा परिस्थितींतहि, शेतीच्या उद्धारास सहकारी चळवळीखेरीज तरणोपाय नाहीं, असें गोरवाला कमिटीनें नमूद केलें आहे.

परिस्थितीचें हें वर्णन सर्वांना मान्य होण्याजोगेंच आहे. पण त्यावर सुचविलेली उपाययोजना मात्र धाडसी स्वरूपाची आहे. सहकारी संस्था व राज्य सरकारें ह्यांची भागीदारी, रिझर्व्ह बँक व राज्य सरकारें ह्यांचा सहविचार आणि रिझर्व्ह बँकेकडून भरपूर आर्थिक मदत, ह्यांवर कमिटीच्या शिफारसी आधारलेल्या आहेत. बँकेच्या सल्ल्यानें प्रत्येक राज्यानें सहकारी प्रगतीची योजना तयार करावयाची आहे. राज्य सहकारी बँका व लँड मॉर्गेज बँका ह्यांच्या भाग भांडवलाची वाढ करून त्यांतील ५१% भाग राज्य सरकारनें धारण करावयाचे आहेत. सेंट्रल बँका व मोठ्या आकाराच्या प्राथमिक संस्था ह्यांच्या बाबतींतहि हीच गोष्ट केंद्रीय सहकारी संस्थेमार्फत साधावयाची आहे. अशासाठी लागणारा पैसा कर्जाऊ देण्यासाठी रिझर्व्ह बँकेनें नॅशनल क्रेडिट (लाँगटर्म ऑपरेशन्स) फंड निर्माण करावयाचा आहे व त्यांत दरसाल ५ कोटी रुपये घालावयाचे आहेत. मालाच्या विक्रीसाठीहि अशीच सरकार-मार्फत व्यवस्था केली जाणार आहे. कर्जपुरवठ्याप्रमाणें इतरहि कित्येक आवश्यक बाबींची चर्चा गोरवाला कमिटीनें केली आहे व योग्य प्रकारच्या शिक्षणानें सज्ज अशा सरकारी व बिनसरकारी कार्यकर्त्यांची जरूरीहि प्रतिपादली आहे. ह्या नोकरांमध्यें ज्ञान, कार्यक्षमता, सचोटी, शेतकऱ्यांबद्दल सहानुभूति, खेडेगांवी जीवनाबद्दल आस्था, इत्यादींची अपेक्षा करण्यांत आली आहे.

खेडेगांवांतील आजच्या चालू व्यवस्थेच्या जागीं सहकारी व्यवस्था आणणें व त्यासाठी मोठमोठ्या मध्यवर्ती सरकारी व निमसरकारी सहकारी संस्था स्थापन करणें, हें गोरवाला कमिटीच्या शिफारशींचें सार आहे. परंतु, खेडेगांवांतील प्राथमिक सोसायट्यांचा कारभार सुधारण्याच्या आधींच मोठाल्या नव्या संघटनांचा प्रयोग सुचविणें म्हणजे आजच्या चालू घडीस मोठाच धक्का देणें होय. नवी योजना यशस्वी होण्याची शक्यता अजमावून नंतरच मग जुनी – ती घडी सुधारण्यास कितीहि वाव असो– मोडणें श्रेयस्कर ठरेल. सरकारी नियंत्रणाखालील व भागीदारींतील सहकारी संघटना यशस्वी होण्यासाठी ज्या गोष्टी आवश्यक आहेत, त्यांचा प्रथम विचार झाला पाहिजे. ग्रामीण आर्थिक परिस्थिति सुधारण्यास अशा भगीरथ प्रयत्नांखेरीज दुसरा उपाय नाहीं; तो अवलंबिला नाहीं तर पद्धतशीर उद्धाराची आशाच नाहीं, असा धडा गोरवाला कमिटीचा रिपोर्ट आपणांस शिकवीत आहे.

---

**सोव्हिएट रशिआचें पोलादाचें उत्पादन**—चालू वर्षी रशिआंतील पोलादाचें उत्पादन ४५ लाख टनांनीं वाढलें अशी माहिती मास्को नभोवाणीवरून सांगण्यांत आली. रशिआचें पोलादाचें एकूण उत्पादन आतां ४ कोटी टनांपर्यंत वाढलें असल्याचीहि घोषणा करण्यांत आली.

**ग्रामपंचायतींसाठी रेडिओ**—म्हैसूर राज्यांतील ग्रामपंचायतींना देण्यासाठी म्हणून म्हैसूर सरकार पुढील वर्षीं ५०० स्टँडर्ड रेडिओ सेट्स खरेदी करणार आहे, असें समजतें. रेडिओ-सेट, बॅटरी व इतर साहित्याला लागणाऱ्या खर्चापैकी निम्मा खर्च भारत सरकारच्या माहिती खात्यानें देण्याचें कबूल केलें आहे.

**भूकंपामुळें रेताडांत पाणी लागलें**—कांहीं दिवसांपूर्वी अमेरिकेंतील पश्चिमेकडच्या पांच संस्थानांत भूकंपाचा धक्का बसला होता. ह्या धक्क्याचें स्वरूप पावसाच्या सरीसारखें हलतें होतें. धक्क्यामुळें नेव्हाडा संस्थानांतील एका रेताडांत जमीन फाटली आणि जमिनीला पडलेल्या भेगेंतून जोराचा पाण्याचा प्रवाह वाहूं लागला आहे.

**भारतांतील जननाचें प्रमाण**—१९५२ पासून भारतामधील जननाचें प्रमाण हळूहळू घटत चाललें असल्याचें समजतें. १९५२ मध्यें भारतामधील जननाचें प्रमाण गेल्या पांच वर्षांतील सर्वांत जास्त म्हणजे दर हजार लोकसंख्येमागें ३० इतकें होतें. गेल्या वर्षी तें २६ झालें आणि चालू सालच्या पहिल्या पांच महिन्यांत तें २३ झालें आहे.

**माजी राणीच्या अनुनयाचा परिणाम**—इजिप्तची माजी राणी नारिमन हिचा अनुनय करण्याबद्दल शेख इझ्झत जाफर ह्या लक्षाधीशाला कुवाइटच्या शेखच्या गादीवरून काढून टाकण्यांत आलें आहे असें समजतें. चालू वर्षाच्या प्रारंभीं त्यानें हें प्रणयाराधन चालविलें होतें. चीफ ऑफ दि रॉयल कॅबिनेट ह्या जागेवरूनहि त्याला कमी करण्यांत आलें आहे.

**चीनमधील उच्च शिक्षण**—चीनमधील उच्च शिक्षणाच्या संस्थांतून २,५०,२०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत असें समजतें. त्यांपैकी १,५०,००० विद्यार्थी एंजिनिअरिंग, शास्त्रें, आरोग्य व शेती ह्या विषयांचा अभ्यास करीत आहेत. शिवाय दरवर्षी २५,००० एंजिनिअर्स दोन वर्षांचा शिक्षणक्रम पुरा करून तयार करण्यांत येतात.

## व्याज आकारणीचें पुस्तक
### ( विस्तृत जंत्रीसह )

[ लेखक : कृ. गो. घाटपांडे, बँक एजंट, पुणें सें. को. बँक लि., वडगांव स्टेशन, जि. पुणें. पृ. सं. ७०. किं. २ रु. टपालव्यय निराळा. ]

पुणें सें. को. बँकेचे एजंट श्री. कृष्ण गोपाळ घाटपांडे ह्यांनीं व्याज आकारणीचें वरील पुस्तक तयार करून प्रसिद्ध केलें आहे. व्याज आणि कर्जें यांची संक्षिप्त माहिती उदाहरणें सोडून दाखवून त्यांनीं दिली आहे. त्यामुळें दुसऱ्या भागांतील जंत्रीचा उपयोग नवीन लोकांनासुद्धा करतां येणें सोपें झालें आहे. जंत्रीमध्यें व्याजाचे पाव पैपासून पुढील ५० दर मुद्रित केले आहेत, आणि व्याजाच्या आकड्यांचें गणित सूक्ष्म असें आहे. जंत्री निर्दोष व्हावी यासाठी लेखकानें विशेष परिश्रम घेतलेले आहेत. जंत्री वापरणारांच्या सोईचा लेखकानें पूर्णपणें विचार केलेला आहे. व्याज आकारणीशीं संबंध येणाऱ्या सहकारी सोसायट्या, बँका, विमा कंपन्या, सावकार, इत्यादींना प्रस्तुत पुस्तक अत्यंत उपयुक्त वाटेल, ह्यांत संशय नाहीं.

## छापखान्यांतील कामगारांची परिस्थिति

भारतांत असलेल्या सुमारें १६०० छापखान्यांपैकीं ५० टक्के छापखान्यांतून प्रत्येकीं २० हून कमी आणि आणखी २५ टक्के छापखान्यांत प्रत्येकीं २० ते ५० कामगार नोकरीस असतात, असें लेबर ब्यूरोनें निरनिराळ्या राज्यांतील छापखान्यांतील कामगारांच्या स्थितीबाबत गोळा केलेल्या १९५१ मधील माहितीवरून दिसून येतें. नोकरींत असलेल्या ७१,२९१ कामगारांपैकीं फक्त २३९ स्त्रिया व ८३४ तरुण मुलें असल्याचें दिसून आलें.

अंदाजें ३,००० कामगार नोकरींत असलेल्या निरनिराळ्या राज्यांतील मुख्यत्वें मध्यम व मोठ्या अशा ४० छापखान्यांतून लेबरब्यूरोकडे मिळालेल्या तपशीलवार माहितीवरून असें दिसतें कीं सुमारें ७८ टक्के कामगार कायम नोकरींतून असून एकूण कामगारांच्या ८७ टक्के कामगार रोजंदारीवर आहेत.

### मासिक वेतन

बऱ्याच छापखान्यांतून एकच पाळी चालते व कामाचे तास ७॥ ते ८ पर्यंत असतात. मासिक पगाराचें किमान प्रमाण त्रावणकोर–कोचीन व जम्मू आणि काश्मीरमध्यें १२ रु., मद्रासेंत १५ रु. तर उत्तर प्रदेशांत तें ४५ रु. व अजमीरमध्यें ५५ रु. आढळून आलें. बऱ्याच ठिकाणीं पुरेसा महागाई भत्ताहि देण्यांत येत होता. कांहीं ठिकाणीं इतर भत्ते व सवलतीहि उपलब्ध होत्या. एकूण मासिक उत्पन्न त्रावणकोर–कोचीनमध्यें १५ रु., मद्रासेंत २० रु., तर मुंबईंत ५१ रु., पंजाबमध्यें ५३ रु. १२ आणे व सौराष्ट्रांत ६० रु. पर्यंत वेगवेगळें आढळून आलें. अकरा छापखान्यांनीं कामगारांना बोनस दिला. फक्त दोनच छापखान्यांतून नियमितपणें पगारवाढ देण्यांत येई. कामगारांच्या सुखसोयींकडे फारसें लक्ष देण्यांत आलेलें दिसलें नाहीं. ४० छापखान्यांपैकीं फक्त चारांनीं कामगारांची रहाण्याची सोय केली होती, तर १८ मध्यें वैद्यकीय उपचारांची व चार छापखान्यांतून सवलतीचे दरानें पुरवठा करण्यासाठी धान्य-दुकानांची व्यवस्था होती. १३ छापखान्यांतून कॉंट्रिब्यूटरी प्रॉ. फंडाची सोय होती. कामगारांनीं भरावयाच्या रकमेचें प्रमाण ६¼ ते ८⅓ टक्के आढळून आलें.

सचोटी, सुरक्षितता आणि सौजन्याचें प्रतीक
१९१८
सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक
लिमिटेड.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई
अधिकृत भांडवल रु. १०,००,०००
वसूल झालेलें भांडवल रु. ७,२७,३००
रिझर्व रु. ६,०६,०००
ठेवी रु. १,२२,१८,०००
बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.
शाखा :- दादर, माहीम, बेळगाव, पुणें.

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

कण आणि क्षण
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
पृष्ठसंख्या १६८ } दुसरी आवृत्ति { किं. १॥ रु. ट. ख. ४ आ.
लेखक : श्रीपाद वामन काळे, संपादक, “ अर्थ ”
“ मार्मिक निरीक्षण व नाजूक विनोद ” —र. पु. परांजपे
“ नव्या पिढीचें उद्बोधक गाईड ” —वि. द. घाटे
“ मनरंजनाबरोबर विचारांत महत्त्वाची भर ” —शं. वा. किर्लोस्कर
“ प्रापंचिकाचें चित्ताकर्षक मार्गदर्शन ” चिं. वि. जोशी
“ खुबीनें रंगविलेलें कौटुंबिक चित्र ” —इरावती कर्वे
“ कर्मयोगाचे सुबोध धडे ” —ना. सी. फडके
“ सुबोध, व्यावहारिक व पटणारें विवेचन ” —इंदिराबाई देवधर

## तांदळांतील पोषक द्रव्यें

तांदूळ हा आशियांतील लोकांच्या दररोजच्या धान्याच्या खाद्यामधील एक महत्त्वाचा खाद्यपदार्थ आहे. जगाच्या जवळ-जवळ अर्ध्या लोकसंख्येचें तांदूळ हें मुख्य खाद्य आहे. याकरितां भातापासून तांदूळ तयार करण्याच्या क्रियेपासून तों तांदळाचा भात तयार करण्यापर्यंत ज्या ज्या क्रिया कराव्या लागतात त्या बाबतींत कोणकोणती काळजी घेतली पाहिजे हें समजणें अत्यंत आवश्यक आहे. परंतु तत्पूर्वी तांदळामधील पोषक द्रव्यें, त्यांचे गुणधर्म, याबद्दलहि माहिती असणें आवश्यक आहे.

### तांदळामधील द्रव्यें

तांदळामध्यें शरीरपोषणास लागणारीं बहुतेक सर्व द्रव्यें कमी अधिक प्रमाणांत असतात. तांदळामधील स्टार्च किंवा मंड (पिठूळ भाग) यापासून शरीरामध्यें उष्णता उत्पन्न करण्याचें कार्य होतें, व यापासून कार्यशक्तिहि निर्माण होते. तांदळा-मधील प्रोटीन किंवा प्रोत द्रव्याचें प्रमाण इतर अन्नपदार्थ म्हणजे ज्वारी, बाजरी, गहूं यामधील प्रोतद्रव्यापेक्षा थोड्या कमी प्रमाणांत असलें, तरी तांदळामधील प्रोत फारच उच्च दर्जाचें असतें. प्रोतद्रव्याचें कार्य म्हणजे शरीरकोशांची झीज भरून काढून त्यांची वाढ करणें हें होय. तांदळामध्यें 'अ' व्हिटॅमिन (जीवनसत्त्व) याचें प्रमाण थोडें कमी असलें तरी 'ब' व्हिटॅमिन बऱ्याच जास्त प्रमाणांत असतें. हें जीवनसत्त्व फारच महत्त्वाचें असून याच्यामुळें रोगप्रतिकारक शक्ति येते. हीं जीवनसत्त्वें तांदळावरच्या भागांत व बीजांकुरांमध्यें असतात. त्याचप्रमाणें तांदळांतील खनिजद्रव्येंहि तांदळाच्या वरील भागांत म्हणजे तांदळावरील पातळ आवरणांत, म्हणजे कोंड्यामध्यें असतात. तांदळामध्यें फॅट किंवा स्निग्धद्रव्याचें प्रमाण फारच कमी असतें. परंतु इतर खाद्यपदार्थांतून हें आपणांस मिळूं शकतें. वरील शिवाय तांदळामध्यें लोह, फॉस्फरस, वगैरेहि खनिजद्रव्यें असतात.

### तांदूळ तयार करतांना घ्यावयाची काळजी

वरीलप्रमाणें महत्त्वाचीं बहुतेक पोषक द्रव्यें तांदळामध्यें असलीं तरी, भात तांदूळ सडून तयार करण्याच्या क्रियेमध्यें हीं निघून जाणार नाहींत याबद्दल बरीचशी काळजी घ्यावी लागते. गिरणींत सडून तांदूळ पांढरेशुभ्र करण्याच्या क्रियेमध्यें तांदळावरील कोंड्यांतून खनिजद्रव्यें व जीवनसत्वें नाहींशीं होतात. तांदूळ अगदीं पांढराशुभ्र न करतां थोडा असडी ठेवला असतां त्यांतील द्रव्यें बऱ्याच प्रमाणांत राहतात. याकरितां हातसडीचे तांदूळ या बाबतींत फार चांगले. कारण, त्याच्यावरील सर्व कोंडा जाऊन ते पांढरे शुभ्र होत नसल्यामुळें तांदुळांत पोषक द्रव्यें व जीवनसत्त्वें रहातात व त्यामुळें ह्या तांदुळाचा भात जास्त रुचकरहि लागतो.

उकडे तांदूळहि बरे असतात. भातापासून तांदूळ तयार करण्या-पूर्वी भातास वाफ देण्याची पद्धत आहे. त्यामुळें भाताचें टरफल सुटून तांदूळ सहज बाहेर येतात. यामुळें तांदळांतील पोषक द्रव्यें नाहींशीं होत नाहींत.

### भात करतांना घ्यावयाची काळजी

भात पांढरा होण्याकरितां तांदूळ दोन, तीन किंवा अधिक वेळांहि धुतला जातो. तांदूळ जास्त धुण्यानें तांदळामधील खनिज द्रव्यें व जीवनसत्त्वें हीं धुण्याच्या पाण्यामध्यें विरघळून निघून जातात. करितां तांदूळ जास्त धुवूं नयेत व धुतांना पाणी बेताचेंच घालावें. जास्त पाणी झाल्यास तें फेंकून न देतां भात शिजवि-तांना त्याचा उपयोग करावा किंवा इतर अन्नपदार्थ शिजविण्यास त्याचा उपयोग करावा. त्याचप्रमाणें तांदूळ शिजवितांना पाणी जास्त झाल्यास तें फेंकून न देतां त्याचाहि उपयोग इतर पदार्थ शिजविण्याकडे करावा.

तांदळांतील पोषक द्रव्यें फुकट जाणार नाहींत याकरितां खालील बाबतींत कटाक्षानें लक्ष घालणें जरूरीचें आहे:—

(१) तांदूळ शक्य तर हातसडीचा वापरणें चांगलें, कारण त्यामुळें तांदळाच्या मोडांतील व वरील भागांतील खनिज द्रव्यें व जीवनसत्वें नाहींशीं होणार नाहींत.

(२) गिरणींतूनच तांदूळ सडून घ्यावयाचा असल्यास तांदूळ अतिशय पांढरा होईतों सडून घेऊं नये.

(३) तांदूळ वरचेवर, दोन तीन वेळ धुण्याची पद्धत बरी नाहीं. धुवून जास्त झालेलें पाणी फेकून देऊं नये.

(४) तांदूळ शिजवितांना जास्त पाणी झाल्यास तें फेकून न देतां इतर खाद्यपदार्थ शिजविण्याचे कामीं त्याचा उपयोग करावा.

### आरोग्यदृष्ट्या तांदळाचें महत्त्व

'टाईम्स ऑफ इंडिया' वर्तमानपत्राच्या ता. २७।६।५४ च्या अंकांत खालील माहिती तांदळाच्या आहारासंबंधीं आलेली होती. ती बरीच उपयुक्त वाटल्यावरून खालीं थोडक्यांत दिली आहे. ही माहिती "रक्तदाबावर भाताचें खाद्य" या मथळ्याखालीं आलेली होती.

अमेरिकेंतील ड्यूक युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ मेडिसिन या संस्थेंतील डॉ. वाल्टर केंपनर यांनीं १९४४ पासून रक्तदाब, हृदयविकार, मूत्रविकार, या रोगांच्या सुमारें दोन हजार रोग्यांस गेल्या दहा वर्षांत भाताचें खाद्य देऊन त्यांचा अभ्यास केला व त्यावरून भाताचें खाद्य हा वरील रोगांवर उत्तम उपाय होय असें प्रसिद्ध केलें आहे. मात्र, वरील रोगांच्या सुरवातीपासून नेहमींच्या खाद्याऐवजीं, भात, फळें व साखर योग्य प्रमाणांत खाण्यांत आणण्याची खबरदारी घेतली पाहिजे, असें डॉ. केंपनरचें म्हणणें आहे. ह्या निवेदनावरून भाताचें महत्त्व दिसून येतें. अर्थात्, तांदळामध्यें असणारीं सर्व पोषक द्रव्यें व जीवनसत्त्वें भातामध्यें असलीं पाहिजेत, हें उघड होय.

वा. कृ. कोगेकर


# अन्नाचें रहस्य




बेडेकर मसाले, लोणचीं, पापड ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★

दुकानें—मुगभाट, ठाकूरद्वार, दादर, कोट, परळ

— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

## जगाच्या लोकसंख्येची वाढ

### जननाचें प्रमाण कायम, पण मृत्यू घटले

संयुक्त-राष्ट्रसंघटनेच्या लोकसंख्या-विषयक विभागानें जगाच्या वाढत्या लोकसंख्येविषयीं रोममध्यें भरलेल्या तद्विषयक परिषदेंत महत्त्वाची माहिती सादर केली आहे. ही परिषद गेल्या सप्टेंबर महिन्यांत भरली होती. माहितीचा सारांश थोडक्यांत असा आहे.

१६५० मध्यें जगाची लोकसंख्या अंदाजें ४७ कोटी असावी. ती १९५० मध्यें २४० कोटी इतकी वाढलेली होती १६५० ते १८५० ह्या दोन शतकांत लोकसंख्येची वाढ दरवर्षीं सरासरीनें दरहजारीं ४ इतकी होत असे. १८५० ते १९०० ह्या पन्नास वर्षांत वाढीचा वेग ७ असा होता, आणि १९०० ते १९५० ह्या पन्नास वर्षांत वाढीचा वेग ९ असा होता. हल्लीं दरवर्षीं सुमारें २ ते ३ कोटींनीं जगाची लोकसंख्या वाढत आहे, असा अंदाज आहे. जगाच्या निरनिराळ्या भागांतील लोकसंख्या सारख्याच गतीनें वाढत होती, असा मात्र अर्थ नाहीं. १८५० ते १९०० ह्या कालखंडांत उत्तर-अमेरिकेंतील आणि युरोपमधील लोकसंख्येच्या वाढीचा वेग सर्वांत अधिक होता. विसाव्या शतकांत युरोपमधील वाढीचा वेग मंदावल्याचें दिसून येतें. ह्याच कालांत द. अमेरिका, भारत, पाकिस्तान व जपान ह्या देशांतील लोकसंख्या फार झपाट्यानें वाढली असल्याचें दिसून येतें. १९२१-१९५१ ह्या कालखंडांत भारताच्या लोकसंख्येंत १०.८ कोटी माणसांची भर पडली. द. अमेरिका व पूर्वेकडील देश ह्यांच्या लोकसंख्येंत ही जी वाढ झाली तिचें एक वैशिष्ट्य लक्षांत ठेवण्यासारखें आहे. दरवर्षीं दरहजारीं होणाऱ्या जन्मांच्या संख्येंत वाढ झाल्यामुळें ही लोकसंख्या वाढलेली नसून मृत्यूंच्या संख्येंत घट झाल्यामुळें वाढ झालेली आहे. वर उल्लेख केलेले देश हल्लीं ज्या देशांना अविकसित देश म्हणतात त्या देशांत मोडणारे आहेत. ह्या देशांत होणाऱ्या लोकसंख्येच्या वाढीविषयीं आणखीहि एक गोष्ट नजरेंत भरणारी आहे. लोकसंख्येच्या वाढीच्या दृष्टीनें ब्रिटनमध्यें अठराव्या शतकाच्या शेवटीं आणि १९ व्या शतकाच्या पहिल्या पन्नास वर्षांत जी स्थिति होती तीच आज अविकसित देशांत असलेली दिसून येते. निदान तशाच परिस्थितीचीं पहिलीं चिन्हें दृग्गोचर होऊं लागलीं आहेत ह्यांत शंका नाहीं. ह्या परिस्थितीचें अस्तित्व तीन लक्षणांनीं भासमान होत आहे. (१) मृत्यूंच्या प्रमाणांत घट (२) जन्मांचें प्रमाण पूर्वीप्रमाणेंच अधिक आणि (३) त्यामुळें लोकसंख्येंत होणारी झपाट्याची वाढ.

विसाव्या शतकांत लोकसंख्येंत जी वाढ होत आहे तीसंबंधीं बराच वाद माजलेला आहे. कांहीं तज्ज्ञांचें म्हणणें असें आहे. कीं, आधुनिक शास्त्रीय शोधांमुळें लोकसंख्येच्या वाढीबरोबरच पुरेसें अन्नोत्पादन करणें शक्य झालें आहे. अर्थात् लोकसंख्येच्या वाढीचा धसका घेण्याचें कारण नाहीं. उलटपक्षीं, डॉ. डडले स्टॅपसारख्या तज्ज्ञांचें मत असें आहे, कीं आधुनिक यांत्रिक शेतीमुळें शेतजमिनींतील माती धुपून जात आहे. अर्थात्च ह्या पद्धतीनें अन्नोत्पादनांत झालेली वाढ टिकाऊ स्वरूपाची नाहीं. म्हणून लोकसंख्येच्या वाढीचा प्रश्न सुटलेला नाहीं.

**इटली-युगोस्लाव्हिआ करार**—युद्धांत झालेल्या नुकसानीबद्दल इटली आणि युगोस्लाव्हिआ ह्याच्यांत करार झाल्याचें समजतें. कराराच्या अटींप्रमाणें इटलीनें युगोस्लाव्हिआला २ कोटी डॉलर्स तीन वर्षांत द्यावयाचे आहेत.


५० वर्षांपेक्षां जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था

सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.




म्यूच्युअल कंपन्यांत सर्वांत अधिक बोनस वाटणारी महाराष्ट्रांतील अग्रेसर विमा कंपनी!!

दि सेन्ट्रल म्यूच्युअल लाईफ इन्शुअरन्स कं. लि.

हयातींतील विम्यास : दरसाल दर हजारीं रु. ७

हयातीनंतरच्या विम्यास: ,, ,, ,, रु. ९

ठिकठिकाणीं प्रतिनिधी नेमणें आहेत.

६७ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई } शं. न. आगाशे, मॅनेजिंग डायरेक्टर

'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

### भारताचें राष्ट्रीय उत्पन्न

भारतीय सरकारच्या सेंट्रल स्टॅटिस्टिकल ऑर्गनायझेशनतर्फे देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नाविषयीं एक निबंध प्रसिद्ध करण्यांत आला आहे. त्यावरून असें दिसतें कीं, १९५१–५२ सालीं देशाचें राष्ट्रीय उत्पन्न त्यामागील सालापेक्षा ४६० कोटी रुपयांनीं वाढलें. १९५१–५२ सालीं राष्ट्रीय उत्पन्नाचा आंकडा ९,९९० कोटी रुपये असा देण्यांत आला आहे. त्यामागील सालीं हा आंकडा ४६० कोटी रुपयांनीं कमी म्हणजे ९,५३० कोटी रुपये होता. सध्याच्या किंमती विचारांत घेतल्या तर १९५१–५२ सालीं भारताचें दरडोई उत्पन्न २७४·५ रुपये पडतें. १९५०–५१ सालच्या तुलनेनें दरडोई उत्पन्नांत ३·५ टक्के वाढ झालेली आहे असें ह्यावरून दिसून येतें. तथापि वस्तूंच्या स्वरूपांत अगर किंमती स्थिर धरल्यास उत्पन्नांत झालेली ही वाढ २·२ टक्केच भरते. ग्रामीण आणि शहरी विभागांत दरडोई झालेल्या उत्पन्नाच्या वाढीचें प्रमाण मात्र सारखें नाहीं, असें दिसून येतें. ग्रामीण विभागांतील उत्पन्नाचें प्रमाण शहरांतील कारखान्यांत झालेल्या वाढीपेक्षा कमी आहे. रेल्वेनें राष्ट्रीय उत्पन्नांत टाकलेल्या भरींत ५१–५२ सालापूर्वीच्या तीन वर्षांच्या तुलनेनें वाढ झालेली दिसते. त्यापूर्वीच्या तीन वर्षांत रेल्वेनें दिलेलें उत्पन्न जवळ जवळ सारखेंच आहे. व्यापार आणि वाहतूक ह्या विभागाकडील उत्पन्नही वाढल्याचें दिसतें. सरकारी अगर सार्वजनिक मालकीच्या अर्थविषयक व्यवसायांकडून मिळालेल्या उत्पन्नांत हळूहळू वाढ होत असल्याचें आढळून येतें.

---

### RESULT OF GOVERNMENT DIPLOMA IN CO-OPERATION AND ACCOUNTANCY

**Examination held in October 1954, at Poona**

Passed in the whole Examination including those who have passed in one or the other part previously.

**Pass Class**

Alalageri, B. K., Bhatt, N. U., Chavan, V. A., Chaudhari, V. A., Choksi, S. N., Deshpande, M. S., Deshpande, R. D., Dorle, D. A., Hunashyal, M. M., Inamdar, R. M., Joshi, D. K., Kulkarni, P. H., Managoli, Y. K., Manglani, B. L., Medsing, J. B., Mehta, S. N., Murudi, S. P., Nagasampagi, Y. A. Naik, R. B., Parikh, N. M., Patel, K. D., Patel, P. B., Patted, V. M., Raj, U. H., Ravetkar, D. M., Shaikh, E. R., Shah, S. D., Swami, V. G., Utpatl. K. D., Vakharkhar, V. G., Venkiteshwaran, K. N., Karlekar M. V., Mudkavi, V. B., Nathwad, R. B., Patel, C. B., Pise, V. D., Shah, H. S., Sonawane, A. R., Sanavane, T. M.

**Passed in 'Co-operation' Group only**

Dodia N. S., Parikh P. M., Patel N. B., Belsare N. M., Desai R. P., Gudi S. M., Shaikh A. R., Sonawane B. P., Vaidya G. L.

**Passed in 'Accountancy' Group only**

Dharmadhikari J. Y., Kulkarni M. C., Mody K. C., Patel B. N., Patel R. A., Patel R. D., Sanu V. N., Shikarkhande B. L., Sontakke N. V., Vandkudri B.T.


## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरी:–भोर, जि. पुणें.**

शाखा:–पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:–बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी, अ. मॅनेजर. — एन्. व्ही. पांडव, मॅनेजर

**–आपली पत सुरक्षित करा–**

उद्योगधंद्यामध्यें माल, वाहनें वगैरेंचे विमे तत्परतेनें घेतले जातात. पण ज्या शब्दावर व पतिवर धंद्यांतील सर्व उलाढाल अवलंबून असते ती न कळत असुरक्षित ठेवली जाते त्याची तरतूद आजच करा.

अधिक माहितीकरितां आजच शाखाधिकाऱ्यांना भेटा अगर लिहा.

—फोन नं. ३४०१—

## वेस्टर्न इंडिया विमा कं. लि. सातारा

पुणें शाखा :– वेस्टर्न इंडिया हाउस, लक्ष्मी रस्ता, पुणें २


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८११ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.